# डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ,

(नॅक समिती तर्फे ''अ" दर्जा प्राप्त)

शैक्षणिक विभाग (०२४०)२४०३११८/२४०३११९
कुलसचिव (का.) २४०३३३४ (नि.)२४००२०३
फॅक्स :(०२४०) २४०३१२४, २४०३३३५
तार : बामुसिटी
म.व.वि.वि.म. (का) (०२४०) २४०३२२३
Web Site-WWW.bamu.net
E-mail: bcud.office@bamu.ac.in

विद्यापीठ परिसर
औरंगाबाद-४३१००४
(महाराष्ट्र)

शैक्ष./संलग्न/एमसीएम/२०१८-१९/ 9396-99

दिनांक : ०४/१०/२०१८

प्रति
प्राचार्य/ प्राचार्या,
सर्व संलग्नीत महाविद्यालय,
डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा
विद्यापीठ औरंगाबाद.

विषय :- शैक्षणिक वर्ष २०१७-१८ साठीचा निरंतर/ वार्षीक संलग्नीकरणाचे नुतणीकरण करण्यासाठी मुदतवाढ देणे बाबत.

संदर्भ :- १) व्यवस्थापन परिषदेचा दि. १६/१०/२०१७ रोजीचा ठराव.

महोदय,

उपरोक्त विषयाच्या अनुषंगाने आपणास कळविण्यात येते की, विद्यापीठ कार्यक्षेत्राअंतर्गत औरंगाबाद, जालना, बीड व उस्मानाबाद या जिल्हातील येणाऱ्या सर्व संलग्नीत महाविद्यालयास शैक्षणिक वर्ष २०१९-२० करिता वार्षीक/ निरंतर संलग्नीकरणाचे प्रस्ताव विहित केलेल्या नियमानुसार, विहित शुल्कासह, विहित मुदतीच्या आत, विद्यापीठाने नव्याने चालू केलेल्या ऑनलाईन प्रणालीमध्ये भरून किंवा ऑनलाईन पद्धतीने नियमान्वये शुल्क भरलेला आहे, परंतु काही कारणास्तव अपुरी माहिती भरलेला प्रस्ताव असेल त्यास मुदतवाढ देण्यात येत आहे.

प्रस्तुत प्रकरणी संदर्भ क्रमांक १ अन्वये निर्देशित केल्यानुसार किंवा दि. १६/१०/२०१७ रोजीच्या व्यवस्थापन परिषदेच्या बैठकीमध्ये घेण्यात आलेल्या ठरावाच्या अनुषंगाने शैक्षणिक वर्ष २०१९-२० करिता ज्या महाविद्यालयानी संलग्नीकरणाचे नुतणीकरण करण्याकरिता काही कारणास्तव प्रस्ताव सादर केलेले नाही अशा संबंधीत महाविद्यालयाचे विहित मुदतीतनंतर प्राप्त होणारे प्रस्तावास निर्धारित शुल्काच्या दुप्पट शुल्क आकरण्यात येईल.

वरील विषयाला अनुसरून शैक्षणिक वर्ष २०१९-२० करिता फक्त वार्षीक/ निरंतर संलग्नीकरणाचे प्रस्ताव ऑनलाईन प्रणालीमध्ये भरून किंवा ऑनलाईन पद्धतीने स्विकारण्यासाठी, ऑनलाईन लिंक चालू ( Open) ठेवण्यास मा. प्र. कुलगुरू यांच्या आदेशानुसार १८ ऑक्टोबर २०१८ पर्यंत मुदतवाढ देण्यात येत आहे. तरी विद्यापीठाने नव्याने चालू केलेल्या ऑनलाईन प्रणालीमध्ये संबंधीत महाविद्यालयांनी वस्तुनिष्ठ परिपुर्ण माहिती भरून या कार्यालयास भरलेल्या निरंतर संलग्नीकरण प्रस्तावाची हार्ड कॉपी सादर करावी. तरी सर्व संलग्नीत महाविद्यालयाने याची कृपया नोंद घ्यावी.

**सोबत :-** उपरोक्त संदर्भ क्र. १ चा ठराव.

उपकुलसचिव
[शैक्षणिक विभाग]

**प्रतिलिपी :-**

१) या पत्राची प्रत **मा. संचालक, युनिक (UNIC) विभाग,** डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ औरंगाबाद यांना विनंती करण्यात येते की, फक्त वार्षीक/ निरंतर संलग्नीकरणाचे प्रस्ताव ऑनलाईन प्रणालीमध्ये भरून किंवा ऑनलाईन पद्धतीने स्विकारण्यासाठी, ऑनलाईन लिंक तात्काळ चालू ( Open) करून द्यावी हि विनंती.

२) या पत्राची प्रत. मा. संचालक,परीक्षा व मुल्यमापन मंडळ, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ औरंगाबाद यांना माहितीस्तव  अग्रेषित.

३) या पत्राची प्रत मा. व्यवस्थापकीय संचालक महाराष्ट्र ज्ञान मंडळ मर्या, ( MKCL) आय. सी. ट्रेड टॉवर, ५ वा मजला, ए विंग सेनापती बापट मार्ग, पुणे यांना माहितीस्तव व पुढील योग्य त्या कार्यवाहीस्तव अग्रेषित.

-sd-

**उपकुलसचिव**

[शैक्षणिक विभाग]